**विशेष दिवाणी दावा क्र. १७७/२०२५ मधील निशाणी ३० वरील आदेश.**

(कुंडलिक खोत वि. प्रकाश विरपन्ना चांभार कांबळे वैगेरे)

**(CNR No-MHSN02-001138-2025)**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांची कैफीयत/म्हणणे दाखल करणेस झालेला विलंब माफ होऊन कैफीयत/म्हणणे दाखल करण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

**अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे** –

२. प्रस्तुत कामात प्रतिवादी यांना दिनांक ०८/०८/२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे. सदर कामातील प्रतिवादी क्र. १ यांना दिनांक ०१/०४/२०२४ पासुन वैद्यकीय उपचार चालु आहेत. प्रस्तुत प्रतिवादी यांना गॅंगरीन झाल्याने व प्रतिवादी यांना चालता फिरता येत नसल्याने त्यांना वकील नेमुन सदर दाव्यास कैफियत देणे शक्य झालेले नाही. आजही प्रस्तुत प्रतिवादीस कोर्टात येण्यास शक्य नव्हते परंतु प्रतिवादी हे व्हील चेअर वरुन त्यांनी सदर अर्जावर व कैफियतीवर तसेच प्रतिज्ञापत्रावर सह्या केल्या आहेत. सदरचा विलंब प्रतिवादी यांनी जाणुनबुजून केलेला नाही. प्रस्तुत प्रतिवादींची प्रकृती थोडीशी सुधारताच प्रतिवादींनी सदरचा अर्ज दिला आहे व त्याबाबत डॉक्टरांचा अहवाल ही सदर कामी हजर केला आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्याची विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास वादी यांनी निशाणी ३२ कडे म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे. वादी यांचे असे म्हणणे आहे की, अर्जात दिलेले कारण संयुक्तीक नाही. प्रतिवादी क्र. १ ते ४ हे या कामी संगणमताने सदरचे कामकाज चालविणेस टाळाटाळ करत आहेत. सबब, प्रतिवादी यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. दोन्ही विद्वान विधीज्ञांचा सविस्तर युक्तीवाद ऐकण्यात आला. युक्तीवादाच्या अनुषंगाने संचिकेचे अवलोकन केल्यास असे दिसून येते की, वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा प्रस्तुतचा दावा हा करारपत्रावरुन खरेदीपत्र होऊन मिळणेकरिता तसेच निरंतर ताकीदीकरिता दाखल केलेला आहे. प्रस्तुत प्रतिवादींनी अर्जात नमुद केलेले कारण संयुक्तीक वाटते. दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तुत प्रतिवादींना आपले म्हणणे मांडण्याची संधी देणे गरजेचे वाटते. तसेच, दावा गुणदोषावर चालून वादी–प्रतिवादी मधील सर्व वादप्रश्न एकाच दाव्यात निकाली काढण्यास न्यायालयासही मदत होईल. प्रस्तुत प्रतिवादी यांना निश्चितच कैफीयत/म्हणणे दाखल करण्यास विलंब झालेला आहे. केवळ विलंब झाला आहे म्हणून कैफीयत/म्हणणे नाकारणे न्यायोचित होणार नाही. त्यामुळे कैफीयत/म्हणणे दाखल करुन घेतल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट अर्ज नामंजूर केल्यास प्रतिवादींना त्यांचे म्हणणे मांडता येणार नाही परिणामी त्यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

अर्ज (निशाणी ३०) मंजूर करण्यात आला.

VIBHA PRAKASH GAIKWAD
Digitally signed by VIBHA PRAKASH GAIKWAD
Date: 2026.03.12 18:00:43 +0530

सांगली. (विभा प्र. गायकवाड)

दि. ११/०३/२०२६. सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सांगली.